# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२)

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपिल

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपिल क्र.५०६०/२०१६/जळगांव**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री.साबीर नूर अहमद पटेल,<br>रा.मु.पो.साकेगांव, ता.भुसावळ,<br>जि.जळगांव. | सहकार अधिकारी (प्र.श्रे.)<br>अधिन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था भुसावळ यांचे कार्यालय,<br>नगरपालिका हायस्कुलच्या मागे,<br>अॅड्राठोड बिल्डींग, जामनेर रोड,<br>भुसावळ ता.भुसावळ, जि.जळगांव. | सहाय्यक निबंधक,<br>सहकारी संस्था,<br>नगरपालिका हायस्कुलच्या मागे,<br>अॅड्राठोड बिल्डींग, जामनेर रोड,<br>भुसावळ ता.भुसावळ, जि.जळगांव. |

**द्वितीय अपिल सुनावणी दिनांक २६/०२/२०२६**

| मूळ अर्ज दिनांक | मूळ अर्ज ज.मा.अ. यांना प्राप्त दिनांक | ज.मा.अ. यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १४/०७/२०१६ | १४/०७/२०१६ | १९/०८/२०१६ | ०९/०९/२०१६ | ०९/०९/२०१६ | १४/१०/२०१६ |

अपिलार्थी यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे रीट याचिका क्र.११९३९/२०२१ दाखल केली असून त्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दि.१७/०१/२०२६ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

(i) The Writ Petition is partly allowed.

(ii) The order dated 05.09.2018 passed by the State Information Commissioner, Nashik Region, Nashik, in Second Appeal No.5060 of 2016 is quashed and set aside.

(iii) The Second Appeal No.5060 of 2016 stands restored to the file of the State Information Commissioner.

(iv) The Petitioner shall appear before the State Information Commissioner, Nashik Region, Nashik on 27.01.2026.

(v) The State Information Commissioner shall decide the appeal afresh, after granting an opportunity of hearing to the petitioner, within a period of six (6) months from the date of appearance.

२. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या उपरोक्त निर्णयानुसार अपिलार्थी यांनी दि.२७/०१/२०२६ ऐवजी दि.०३/०२/२०२६ रोजी आयोगासमोर उपस्थित राहून लेखी विनंती अर्ज सादर केला आहे. त्यामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, ना.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे रीट पिटीशन नं.११९३९/२०२१ आदेश दि.१७/०१/२०१६ संदर्भात आदेशाप्रमाणे दुसरे अपिल क्र.५०६०/२०१६ ची सुनावणी होऊन निर्णय सहा महिने कालावधी देण्यात आला आहे.

मे.उच्च न्यायालयाने दि.२७/०१/२०२६ रोजी मे.राज्य माहिती आयुक्त नाशिक येथे हजर राहण्याचे आदेश दिले होते. परंतू सदरील आदेशाची माहिती मला दि.२८/०१/२०२६ रोजी माझे वकीलांकडून मिळाली, त्याप्रमाणे मी आज रोजी मे.राज्य माहिती आयुक्त सो. यांचे समक्ष हजर राहून सुनावणी करिता तारीख मिळण्यास विनंती करीत आहे. तरी मे.कोर्टास विनंती की, मला सुनावणीची तारीख कळविण्यात यावी ही नम्र विनंती.

३. यासंदर्भात नमूद करण्यात येते की, मा.उच्च न्यायालयाच्या वरील आदेशानुसार अपिलार्थी यांनी दि.२९/१२/२०१६ रोजी आयोगाकडे दाखल केलेल्या या द्वितीय अपिल क्र.५०६०/२०१६/जळगांव ची सुनावणी दि.२६/०२/२०२६ रोजी आयोजित करण्यात आली.

४. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी व त्यांचे प्रतिनिधी ॲड धिरेंद्र पाल उपस्थित असून संबंधित जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

५. अपिलार्थी यांनी दि.१४/०७/२०१६ रोजीच्या मूळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५/०२/२००६ या कालावधीतील १९६० चे कलम १०१ दाखल्याबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

श्री.अनिल घन:शाम दरडा रा.भुसावळ यांचेविरुध्द कायदा कलम १९६० चा दाखला १०१ विठ्ठल रखुमाई अर्बन को.ऑप.क्रेडीट सोसायटी लि. भुसावळ यांनी मिळविलेला आहे. सदर दाखल्यांच्या पुढीलप्रमाणे नकला मिळाव्या.

१) १९६० चे कलम १०१ दाखल्याची नक्कल.

२) सुनावणीचे कागदपत्र नक्कल

३) १०१ प्रकरणासाठी भरलेल्या चलनाची पावती नक्कल.

६. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.१९/०८/२०१६ च्या पत्रान्वये अपिलार्थीस असे कळविले आहे की, या कार्यालयात दि.०९/०८/२००७ पासून कलम १०१ खाली स्वतंत्र रजिस्टर ठेवणेत आलेले आहे. ते अवलोकन केले असता कलम १०१ खाली संस्थेस वसूली दाखला दिल्याची नोंद आढळून येत नाही. या उपरही आपले समाधान न झाल्यास सदर बाबतीत अपिल करण्याची मुभा आहे.

७. आज सुनावणीवेळी अपिलार्थी यांनी आयोगाकडे लेखी निवेदन सादर केले असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी (प्रथम श्रेणी) यांचेकडे दि.१४/०७/२०१६ रोजी रितसर अर्ज करुन श्री विठ्ठल रखुमाई अर्बन को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि. भुसावळ यांचेबाबत खालीलप्रमाणे दि.१५/०२/२००६ ते १७/०७/२०१६ पर्यंत कालावधीची श्री.अनिल धनश्याम दरडा रा.भुसावळ यांचेविरुध्द झालेली कार्यवाहीबाबत माहितीची मागणी केलेली आहे.

१) जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ प्रमाणे दिलेला वसुली दाखल्याची प्रत.

२) जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाने कलम १०१ प्रमाणे घेतलेली सुनावणी संबंधीचे सर्व दस्तऐवज.

३) जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात कलम १०१ प्रमाणे प्रकरण दाखल करण्यास आवश्यक कोर्ट फी बाबत चलनाची पावती.

वरील अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि.१९/०८/२०१६ रोजी उत्तर देवून कळविले आहे की, या कार्यालयात दि.०९/०८/२००७ पासून कलम १०१ खाली स्वतंत्र रजिस्टर ठेवण्यात आलेले आहे, ते अवलोकन केले असता कलम १०१ खाली संस्थेस वसुली दाखला दिल्याची नोंद आढळून येत नाही.

वरील उत्तराचे विरुध्द अपिलार्थी ने प्रथम अपिल माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९(१) प्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भुसावळ यांचेकडे दि.०९/०९/२०१६ रोजी दाखल केले. सदरील अपिल मंजूर करण्यात आले व खालीलप्रमाणे निर्णय दि.१४/१०/२०१६ रोजी देण्यात आले.

१. अर्जदार यांचे अपिल अंशत: मान्य करण्यात येत आहे.
२. अर्जदार, पक्षकार यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयानुसार जन माहिती अधिकारी व सहाय्यक अधिकारी यांनी अन्य मार्गाने उपलब्ध करुन द्यावीत तसेच आपल्याशी संबंधित् नसलेले अर्ज तात्काळ माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६(३) नुसार वर्ग करण्यात यावेत. कार्यालयाशी निगडीत असलेली माहिती मुदतीत व वेळेत पुरविणेबाबत समज देण्यात येत आहे.
३. अर्जदार यांना त्यांनी मागणी केलेली माहिती संबंधित संस्थेकडून उपलब्ध करुन घेवून माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(६) नुसार ती मोफत पुरविणेत यावी. या कार्यवाहीने समाधान न झाल्यास त्याविरुध्द अपिल करण्याचा अर्जदाराचा अधिकार अबाधित राहील.

वरीलप्रमाणे वरिष्ठांचे आदेश झाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दि.२०/१०/२०१६ रोजी संस्थेस पत्र देवून माहितीची मागणी केली. त्याप्रमाणे संस्थेने दि.०५/११/२०१६ रोजी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास कळविले की, आपण संस्थेकडे जी माहिती सादर करण्यास सांगितली आहे ती माहिती संस्थेकडून साबीर नूर अहमद पटेल यांना देणे शक्य नसून कारण साबीर नुर अहमद पटेल यांचा संस्थेशी कोणताही संबंध नसून ते संस्थेचे कर्जदार, जामीनदार व सभासद नसल्याने त्यांनी मागितलेली माहिती संस्था देऊ शकत नाही. कारण संस्थेची महत्वाची माहिती असल्यामुळे संस्थेचे नुकसान होऊ शकते. जन माहिती अधिकारी यांनी वरील पत्रानुसार माहिती देणे शक्य नाही म्हणून अपिलार्थीस दि.०१/१२/२०१६ रोजी कळविले आहे.

**अपिलार्थी यांनी शासकीय कार्यालयातून झालेली कार्यवाहीची माहितीची मागणी केली आहे** - अपिलार्थी यांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी कलम १०१ प्रमाणे वसुली दाखला देणेबाबत जी न्यायीक चौकशी केली त्याबाबतची माहिती अपिलार्थी यांनी मागणी केलेली आहे. चौकशीअंती देण्यात आलेला कलम १०१ चा वसुली दाखल्याची प्रत मागणी केली आहे. सदरील दस्त हे सार्वजनिक कार्यालयात नियमितपणे ठेवण्यात येत असलेले दस्तऐवज आहे. तसेच सुनावणीचे सर्व कागदपत्रे व शासकीय फी भरल्याबाबतचे चलन हे शासकीय कार्यालयात झालेल्या न्यायीक चौकशीचे

दस्तऐवज आहे. सदरील सर्व दस्तऐवज शासकीय कार्यालयात उपलब्ध ठेवण्याची कायदेशीर जबाबदारी तेथील अधिकारी यांची आहे.

**अपिलार्थी यांची स्वत:ची व कुटुंबाची खालील स्थावर मिळकती वर कर्जदार अनिल घन:शाम दरडा यांचे नावाचे जप्ती बोजेची नोंद आहे त्याकरिता सदरील दस्तऐवज अपिलार्थीस मिळणे आवश्यक आहे. –**

अ) मौजे साकेगांव ता.भुसावळ जि.जळगांव येथील शेत मिळकत भूमापन क्रमांक व उपविभाग ३८/१/ब क्षेत्र ० हे.४०.०० आर पोट खराब ० हे. ९०.०० आर एकूण १ हे.३०.०० आर आकार रक्कम रु.१.६५ पैसे

ब) मौजे साकेगांव ता.भुसावळ जि.जळगांव येथील शेत मिळकत भूमापन क्रमांक व उपविभाग ४३/१/ब क्षेत्र ० हे. ४६.०० आर पोट खराब ० हे. ८१.०० आर एकूण १ हे.२७.०० आर आकार रक्कम रु.१.५० पैसे

क) मौजे साकेगांव ता.भुसावळ जि.जळगांव येथील शेत मिळकत भूमापन क्रमांक व उपविभाग ४४/१/ब/२ क्षेत्र ० हे.६२.०० आर पोट खराब ० हे. ७०.०० आर एकूण १ हे. ३२.०० आर आकार रक्कम रु.०.७१ पैसे

ड) मौजे साकेगांव ता.भुसावळ जि.जळगांव येथील शेत मिळकत भूमापन क्रमांक व उपविभाग ९१/१ क्षेत्र ३ हे. ११.०० आर पोट खराब ० हे. ५२.०० आर एकूण ३ हे. ६३.०० आर आकार रक्कम रु.१३.५५ पैसे

वरील चार ही मिळकतीवर जप्ती आदेशाने श्री विठ्ठल रखुमाई नागरी सहकारी पतसंस्था मर्या. भुसावळ यांचा रु.४७६५४३ होणारे व्याज सरचार्ज चा बोजा अनिल दरडाचे हिस्सेवर वि.वसुली अधिकारी यांचे आदेशान्वये बोजा दाखल अशी नोंद आहे. याकरिता अपिलार्थीने वरील दस्तऐवजांची मागणी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था भुसावळ यांचे कार्यालयात केलेली आहे. मा.उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे शासकीय कार्यालयात सार्वजनिक दस्त उपलब्ध नसल्यास फौजदारी गुन्हा नोंदविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी फौजदारी गुन्हा नोंदविलेले नाही. महाराष्ट्र पब्लिक रेकॉर्ड ॲक्ट २००५ च्या तरतुदींचा भंग झालेला आहे. त्याकरीता ना.उच्च न्यायालय मुंबई चे रिट पिटीशन न.६९६१/२०१२ वर अपिलार्थी भिस्त ठेवत आहे व सदरील युक्तीवाद सोबत प्रत दाखल करीत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेले दस्तऐवज शासकीय कार्यालयातील सार्वजनिक दस्त आहेत. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था भुसावळ हे संस्थेचे सर्व कामकाजावर नियंत्रण ठेवण्यास कायदेशिर जबाबदार आहेत. त्यांनी मागणी केल्यावर पतसंस्थेने सर्व माहिती त्यांना देणे बंधनकारक आहे. पतसंस्थेने सदरील आदेशाविरुध्द कोणतेही अपिल / रिव्हीजन दाखल केलेले नाही.

पतसंस्थेने शासनाकडून अर्थसहाय्य घेतलेले असून सार्वजनिक निधीचा वापर तिथे होतो. त्यामुळे देखील अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती देणे त्यांचेवर सुध्दा बंधनकारक आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींचा भंग केलेला असून मुदतीत अपिलार्थी यांना माहिती दिलेली नाही, म्हणून त्यांची चौकशीचे आदेश होणे आवश्यक आहे. तसेच शासकीय कार्यालयाचा रेकॉर्ड हे पतसंस्थेचे ताब्यात कसे व का आहे याबाबत देखील चौकशी होणे आवश्यक आहे. तरी नम्र विनंती की, अपिलार्थीचे अपिल मंजूर होवून मिळावे व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नियमाप्रमाणे मोफत लवकरात लवकर मिळणेबाबत आदेश होवून मिळावेत ही विनंती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

आज सुनावणीवेळी तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असून त्यांनी कोणताही लेखी अहवाल आयोगास सादर केल्याचे दिसून येत नाही.

८. सुनावणी दरम्यानचा युक्तीवाद आणि आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि.१४/०७/२०१६ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी (प्र.श्रे.) अधिन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था भुसावळ यांनी दि.१९/०८/२०१६ च्या पत्रान्वये या कार्यालयात दि.०९/०८/२००७ पासून कलम १०१ खाली स्वतंत्र रजिस्टर ठेवणेत आलेले आहे. ते अवलोकन केले असता कलम १०१ खाली संस्थेस वसूली दाखला दिल्याची नोंद आढळून येत नाही असे अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येते. तद्नंतर अपिलार्थी यांनी दि.०९/०९/२०१६ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था भुसावळ यांनी दि.१४/१०/२०१६ रोजी अर्जदार यांना त्यांनी मागणी केलेली माहिती संबंधित संस्थेकडून उपलब्ध करुन घेवून माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(६) नुसार ती मोफत पुरविण्यात यावी असे आदेश पारित केल्याचे दिसून येते. प्रथम अपिल निर्णयानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी, अधिन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, भुसावळ यांनी दि.०१/१२/२०१६ च्या पत्रान्वये संस्थेने या कार्यालयास दि.०५/११/२०१६ रोजी दिलेल्या पत्रात असे नमूद आहे की आपण जी माहिती सादर करण्यास सांगितली आहे ती माहिती संस्थेकडून साबीर नुर अहमद पटेल यांना देणे शक्य नसून कारण साबीर नुर अहमद पटेल यांचा संस्थेशी कोणताही संबंध नसून ते संस्थेचे कर्जदार, जामीनदार व सभासद नसल्याने त्यांनी मागितलेली माहिती संस्था देऊ शकत नाही. कारण संस्थेची महत्वाची माहिती असल्यामुळे संस्थेचे नुकसान होऊ शकते असे कळविले आहे. तसेच या कार्यालयाने दिलेल्या पत्रानुसार संस्थेने दि.१६/११/२०१६ रोजी असे कळविले आहे की, माहिती अधिकारान्वये श्री.साबीर नुर अहमद पटेल यांनी मागितलेली माहिती संस्था पुरवू शकत नाही कारण अर्जदार हा संस्थेचा कर्जदार जामिनदार नसल्यामुळे संस्थेची गोपनीय माहिती ही त्यांना देवू शकत नाही. अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानुसार अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती संबधित संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावी व मोफत पुरविण्यात यावी त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी संस्थेकडे माहितीची मागणी करुन ही संस्थेने माहिती पुरविली नाही त्यामुळे अपिल निर्णयानुसार माहिती अधिकारी आपणांस माहिती उपलब्ध करुन देवू शकत नाही.

९. उपरोक्त परिच्छेदात नमूद वस्तुस्थिती पाहता असे स्पष्ट होते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.१४/०७/२०१६ रोजीच्या माहिती अर्जात माहितीशी संबंधित कालावधी दि.१५/०२/२००६ असा नमूद केलेला असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी, अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था भुसावळ यांनी अपिलार्थीस दि.१५/०२/२००६ पासूनची माहिती देण्याऐवजी दि.०९/०८/२००७ पासून या कार्यालयात कलम १०१ खाली स्वतंत्र रजिस्टर ठेवण्यात आलेले आहे. ते अवलोकन केले असता कलम १०१ खाली संस्थेस वसुली दाखला दिल्याची नोंद आढळून येत नाही असे कळविले असून वास्तविक अपिलार्थी यांनी जी माहिती मागितली आहे त्या माहितीबाबतची कार्यवाही सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था भुसावळ यांच्या कार्यालयाकडून होत असल्यामुळे सदरची माहिती त्यांच्याकडे असणे अपेक्षित आहे. त्यामुळे तत्कालीन जन

माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी, अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था भुसावळ यांनी अपिलार्थीस दि.१९/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेले उत्तर / माहिती योग्य नाही. अपिलार्थी यांनी आज सुनावणीवेळी सादर केलेल्या लेखी निवेदनावरुन त्यांनी दि.१४/०७/२०१६ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती ही त्यांच्या व कुटुंबाच्या मालकीच्या स्थावर मिळकतीवर असलेल्या जप्ती बोजेची नोंद बाबत आहे हे पहिल्यांदा नमूद केलेले आहे. तसा कोणताही उल्लेख माहिती अर्ज, प्रथम अपिल अर्ज, द्वितीय अपिल अर्ज व प्रथम अपिल सुनावणीवेळी सादर केलेल्या लेखी युक्तीवाद यामध्ये केलेला नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही त्यांची व त्यांच्या कुटुंबियांच्या मिळकतीसंदर्भात असल्यामुळे सदरची माहिती ही त्रयस्थ पक्षाची होणार नाही. उपरोक्त सर्व विवेचन लक्षात घेता अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना तात्काळ मिळावी म्हणून संबंधित प्राधिकरणाच्या प्रथम अपिलीय अधिकारी यांना माहिती देण्याचे आदेशित करणे आवश्यक आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (क) (दोन) नुसार विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था भुसावळ यांना जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांनी अपिलार्थी यांच्या दि.१४/०७/२०१६ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात मुद्देनिहाय माहिती आयोगाचे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आंत अपिलार्थी यांना नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी आणि त्याबाबतचा अहवाल आवश्यक त्या कागदपत्रांसह आयोगास ३० दिवसांत न चुकता सादर करावा.

२. वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.५०६०/२०१६/जळगांव निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

( भुपेंद्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ९६०२

दिनांक – 04 MAR 2026